# लक्ष्मीपूजन

दीपावलीचा सर्वात आनंददायी असा उत्सव सुरू झाला आहे. या सणाला आपले नातेवाईक आणि मित्रपरिवार यांना शुभेच्छांची देवाणघेवाण केली जाते. काय घडले म्हणजे ते शुभ असेल ? व्यावहारिक चिंता दूर व्हाव्यात ही तर फारच मामुली शुभेच्छा झाली. कारण त्या पुनःपुन्हा उपटणार असतातच आणि त्यांचे निवारण करणे हाच तर पुरुषार्थ आहे. त्यामुळे त्या जर समूळ नाहीशा झाल्या तर करायचे काय ?

दिवाळीमध्ये लक्ष्मीची पूजा, उपासना केली जाते. ही तृप्तीची आणि समृद्धीची देवता आहे. जीवनाच्या विकासासाठी क्षुधा आणि तृष्णा या भावना आवश्यकच आहेत. त्या शांत करण्यासाठी तर सर्व प्रयत्न असतात. पण त्या अनिवार होऊ दिल्या तर सर्व आपल्यालाच हवे अशी वखवख निर्माण होते. तृप्तीची देवता लक्ष्मी मग तिथे राहत नाही. ती तृप्ता आहे आणि जे तृप्त होण्याची इच्छा धरतात त्यांना ती कधीच सोडून जात नाही. ती तृप्त करूसुद्धा शकते आणि हाच तर तिचा खरा प्रसाद आहे.

धन आणि संपत्ती मिळवणे हा पण पुरुषार्थ आहे. पण ती आपल्याजवळच साठवून ठेवण्याचा लोभ होतो. मग साचलेल्या डबक्यातल्या पाण्यासारखी ती अशुद्ध होते. वाटली गेलेली संपत्तीच समृद्धी निर्माण करते. आपल्याबरोबर इतरांनासुद्धा तृप्त करण्याची इच्छा धरणारे लक्ष्मीदेवीला फार प्रिय असतात,

ज्यांचा वाटा त्यांना देणं हे तर महत्त्वाचं आहेच. पण ज्यांच्याजवळ काही नाही, त्यांना इच्छा मारून जगावं लागतं, त्यांचाही समाजात निर्माण होणाऱ्या संपत्तीवर अधिकार आहेच. तो जर त्यांना मिळाला नाही तर चोरी, अपहार अशा कुमार्गाकडे ते आपलं बल खर्च करतील. तसं होऊ देण्यात आपलं सर्वांचंच नुकसान होणार आहे. दिवाळीच्या चार दिवसांत निर्माण झालेल्या संपत्तीचा उपभोग घेताना ज्यांच्यापर्यंत ती पोचलेली नाही त्यांच्यासाठी दान करणारे भक्तसुद्धा लक्ष्मीला फार प्रिय आहेत.

लक्ष्मी ही तेजाची देवी आहे. सूर्य, अग्नी, विद्युत आणि ज्योती या चार रूपांनी तेज तिची सतत आराधना करीत असते. तेजाची दाहकता आपल्या भक्तांसाठी ती सौम्य करते. सूर्याच्या प्रखर तेजाचे, चंद्राच्या शीतल आणि आल्हाददायक चांदण्यांत रूपांतर करते ते तिच्या आवडत्या जीवसृष्टीसाठी.

आपल्या बुद्धीच्या प्रखर तेजाचेसुद्धा ती प्रेमाच्या उबेमध्ये रूपांतर करते. त्यामुळे संपत्तीचा वाटून उपभोग घेणारे, सर्व तृप्त होतील असे पाहणारे लोक जसे तिला आवडतात तसेच इतरांवर प्रेम करू शकणारे पण तिचे लाडके होतात. आपल्याजवळ इतरांना द्यायला ऐहिक संपत्ती नाही म्हणून निराश होण्याचे कारण नाही. कारण प्रेमाची भावना या संपत्तीपेक्षाही प्रबळ आहे. तीही जोपासली तर आपण लक्ष्मीला आणखी प्रिय होणार आहोत. तेजाचा आणखी एक विशेष गुण आहे. प्रकाश, उष्णता, ऊब या साऱ्याच गोष्टी भेदभाव न राखता साऱ्यांनाच ते वाटून टाकतं. दीपोत्सव करताना तेजाच्या या गुणावर अवधान ठेवायचं. म्हणजे आपली पण शत्रुबुद्धी नष्ट होऊन जाते. शत्रूंमध्येसुद्धा मैत्री करण्यासारखे गुण आहेत याचं भान थायला लागतं. तेसुद्धा जर मित्र झाले तर जे समाधान आणि शांती आपल्याला मिळणार आहेत त्यांना तोड नाही.

लक्ष्मीदेवी हे सगळं आपल्याला देणार आहे. ती आपणा सर्वांवर प्रसन्न राहो.

---

**–भीष्मराज बाम**
**('मना सज्जना' या पुस्तकातून)**